महावितरण

# जाहीर सुचना

महाराष्ट्र राज्य. वि.वि.कं.मर्या. अमरावती ग्रामीण विभागा अतंर्गत सत्र २०२२-२०२३ करीता ऑनलाईन पध्दतीने खालील व्यवसायाकरीता शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणाकरीता निवड करावयाची आहे.

विजतंत्री (Electrician)-३२, तारतंत्री (Lineman)-३२ व कोपा पासा-५
एकुण ६९

शैक्षणिक अर्हता १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ १०+२ बंधामधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, २) महाराष्ट्र राज्य माध्यमिक परिक्षा मधील बेस्ट ५ चे गुण ग्राह्य समजले जाणार नाहीत, ३) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन विजतंत्री, तारतंत्री व कोपा/ पासा व्यवसायात उत्तीर्ण झालेला असावा अथवा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ MSBTE या बोर्डाचा डिप्लोमामार्फत इलेक्ट्रिशन दोन वर्ष अभ्यासक्रम समकक्ष असल्यामुळे विजतंत्री व तारतंत्री शिकाऊ उमेदवार सुध्दा अर्ज करण्याकरीता पात्र समजण्यात येईल.

अटी व शर्ती:- १) वयोमर्यादा सर्वसाधारण उमेदवारासाठी किमान १८ वर्ष पुर्ण व कमाल ३० वर्ष असावे. राखीव उमेदवाराकरीता वयाची अट ०५ वर्ष शिथीलक्षम राहील, त्याकरीता उमेदवाराने राखीव गटातील जातीचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, २) सदर उमेदवार हा अमरावती जिल्हयातील रहिवासी असावा (आधारकार्ड मधील पत्यानुसार), (३) प्रशिक्षण कालावधी ०१ वर्ष असेल, ४) विद्यावेतन नियमाप्रमाणे मिळेल, ५) ऑनलाईन अर्ज करतांना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिकामध्ये नमुद केलेले नांव व जन्मतारीख हे आधार कार्डवर नमुद असलेल्या नावाशी व जन्मतारखेशी सुसंगत असावे, तसेच सद्यस्थितीत कार्यान्वित असलेला ई-मेल आय.डी. व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन अचूक नमुद करावा. ६) आय.टी.आय. उत्तीर्ण प्रमाणपत्र व चारही सेमिस्टर गुणपत्रिका स्व:साक्षांकित करून या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे, ७) इच्छुक पात्र उमेदवारांनी www.apprenticeshipindia.org या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज जाहिरातीच्या दिनांकापासून ते दि. १९/११/२०२२ पर्यंत या कार्यालयाचा आस्थापना क्र.E10162702274 यावर योग्य व परिपुर्ण माहितीसह सादर करणे आवश्यक, विहीत मुदतीनंतर सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही, ८) ऑनलाईन नोंदणी अर्जाची प्रत, शैक्षणिक मुळ कागदपत्रे व आधारकार्ड कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या, अमरावती ग्रामीण विभाग मेजर स्टोअर संकुल पॉवर हाऊस, वेलकम पॉईन्ट, अमरावती मोशी रोड, अमरावती येथे दि. १५/११/२०२२ ते दि. २२/११/२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज स्वतः सादर करणे आवश्यक, ९) शिकाऊ उमेदवार यांची निवड माध्यमिक शालांत परिक्षेचे ५०% गुण व आय.टी.आय. चे ५०% गुण असे एकुण गुण विचारात घेऊन गुणवत्ता यादी तयार करुन शिकाऊ उमेदवारांची निवड करण्यात येईल, १०) जाहीरातील अंशतः बदल किंवा संपुर्ण जाहीरात रद्द करण्याचे अधिकार कंपनी राखून ठेवीत आहे.

**कार्यकारी अभियंता,**
**पी.आर.ओ.न. ८६** **म.रा.वि.वि.कं. मर्या, अमरावती ग्रामीण विभाग**